CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;

For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. १२.०३.२०२१**

**सिडकोविषयची अद्ययावत माहिती आता समाजमाध्यमांवरही उपलब्ध**

सिडकोविषयक अद्ययावत माहिती आता युट्यूब, फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम या समाजमाध्यमांवरही उपलब्ध करून देण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे आता सिडको महामंडळाच्या विविध गृहनिर्माण योजना, महामंडळातर्फे घेण्यात येणारे निर्णय व आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम यांविषयीची अद्ययावत माहिती आता नागरिकांना घरबसल्या या समाजमाध्यमांवर मिळणार आहे. याकरिता नागरिकांनी सिडकोला युट्यूबवर - YouTube CIDCO Ltd., फेसबुकवर - f:/cidco, ट्विटरवर - @cidco_ltd आणि इन्स्टाग्रामवर - @cidco_ltd फॉलो करावे, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

नवी मुंबईतील नागरिकांना आपल्याकडून सर्वोत्तम सेवा मिळावी याकरिता सिडको सदैव प्रयत्नशील असते. नागरिकांना विविध सेवा सुलभरीत्या उपलब्ध होतील याकरिता सिडकोने यापूर्वीच आपल्या बहुतांशी सेवा ऑनलाइन डिजिटल माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून सिडकोतर्फे घेण्यात येणारे निर्णय, आखण्यात येणारी धोरणे, राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजना, आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम या सर्वांविषयची अद्ययावत माहिती आता उपरोक्त समाजमाध्यमांवर उपलब्ध करून देण्यात येत आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**